पुण्य नगरी

# स्पर्धा परीक्षेतील यशासाठी सकारात्मक विचार हवेत

## डॉ. मीरा बोरवणकर : ज्ञानदीपच्या कार्यक्रमात तरुणाईला यशाचा कानमंत्र

**गडहिंग्लज :** स्पर्धा परीक्षेतील यशासाठी न्यूनगंड बाजूला ठेवा. प्रबळ इच्छाशक्ती व आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा, यश तुमचेच आहे, असा कानमंत्र निवृत्त पोलीस महासंचालक डॉ. मीरा बोरवणकर यांनी दिला.

येथील ज्ञानदीप प्रबोधिनी संचालित झेप अॅकॅडमी व इंटेट करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वेध भविष्याचा' या विषयावर त्या बोलत होत्या. प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी त्यांची मुलाखत घेतली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.



डॉ. मीरा बोरणकर यांचे स्वागत करताना मीना रिंगणे. सोबत अन्य.

प्राचार्य मीना रिंगणे यांनी स्वागत, सुहास नाडगौंडा यांनी प्रास्ताविक, मीनल मजती यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. सीमा साखरे यांनी आभार मानले. सचिन पाटील, बंडू गवळी, वैशाली हन्नूरकर, परशराम राजगोळे, अर्चना रेडेकर, देणगीदार अर्चना सुळकुडे यांचा सत्कार झाला. उपाध्यक्ष डॉ. बी. एस. पाटील, सचिव संदीप कागवाडे, सहासचिव प्रा. व्ही. के. मायदेव, खजिनदार महेश मजती, संचालक बाबासाहेब आजरी, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजयकुमार घुगरे, संदीप पाटील यांच्यासह डॉ. नागेश पट्टणशेट्टी, प्रा. विजय आरबोळे, प्रा. मनोहर पुजारी, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली, बी. बी. आरबोळे, इंटेटचे प्राचार्य मनोहर गुरबे, रामकुमार सावंत, रवळनाथचे सीईओ डी. के. मायदेव, झेपच्या अधीक्षक गौरी बेळगुद्री, समन्वयक विवेक दड्डी आदी उपस्थित होते.

**हमखास यशासाठी '७' एस**

हमखास यशासाठी सेहद, संकल्प, संयम, संतुलन, संगत, सायलेन्स व सक्सेस हे सात एस महत्त्वाचे आहेत, असे डॉ. बोरवणकर यांनी सांगितले.

Smart Kolhapur Edition
Jul 29, 2023 Page No. 03
Powered by : eReleGo.com